## (तू) तुझे अनामिक

तुझे अनामिक सवते शाजुक
भोंदुपण जपताप तुला
माझी भक्ती असीम प्रीति भक्ती ?
निष्कारि लखलास मला ॥धृ.॥

दिनचर्येचा तुझा सोहळा
लाख मनांशी चाले चाळा
कुणाकुणाला करीशी गोळा ?
खेळ खेळशी सर्व खुळा —
तुझे अनामिक सवते शाजुक
भोंदुपण जपताप तुला ... (१)

क्षणाक्षणाला फुटतो पान्हा
सोंदेबाजी तुझाच बाणा
कळा अवकळा अंगी नाना
कशास झुलवी रिता झुला — ?
तुझे अनामिक सवते शाजुक
भोंदुपण जपताप तुला . (२)

तन चंदेरी मनहि रुपेरी
नित्य सजविशी दारोदारी
पापभिरुवर करीशी स्वारी
आक्रित छळशी प्राणफुला —

तुझे अनामिक सवते शाबुक
भोंदुपण जपताप तुला .. (३)

ज्ञानवंत ना किर्तीवंतहि अज्ञानीहि
\+ प्रज्ञेचा नच स्पर्श तुलाहि
लज्जेचेहि नुरले काही
कोण स्वीकारील सांग मला ?
तुझे अनामिक सवते शाबुक
भोंदुपण जपताप तुला .. (४)

कळण्याआधी असले भरपूर
कसे भासले सारे सुस्वर
तेव्हा जपले उरातले सूर
त्यांत शोधीतो मीच मला —
तुझे अनामिक सवते शाबुक
भोंदुपण जपताप तुला .. (५)
माझी भक्ती असीम प्रीती
२४।७।६८ निष्काहि लखलाभ सहदेव